कोल्ही आणि ससा

रादुगा प्रकाशन · मॉस्को



रशियन लोककथा

चित्रे: ये. राचोव

अनुवाद: अनिल हवालदार



ए
का जंगलातील मोकळ्या मैदानात एक भुरा ससा आणि एक कोल्ही रहात होते.

गोठणारी थंडी येताच सशाच्या केसांचा रंग बदलू लागला. हिवाळ्याची हिमवादळे सुरू झाली, बर्फाचे प्रचंड ढीग जमू लागले तेव्हा सशाचे केस हिमशुभ्र बनले. त्याने स्वतःसाठी एक खोपट बांधण्याचा निर्णय केला. लाकडाचे तुकडे तो गोळा करू लागला. त्याची अशी जोरदार तयारी बघून कोल्ही म्हणाली :

"ए चकण्या, तू काय करतोस?"

"थंडीपासून निवारा घ्यायला खोपट बांधतोय."

"किती चतुर!" कोल्हीला वाटले. "मीसुद्धा खोपट बांधलं पाहिजे. पण लाकडाचं खोपट नव्हे तर अस्सल बिलोरी राजवाडा बांधला पाहिजे!"

आता ती घर बांधण्यासाठी बर्फाचे मोठमोठे तुकडे गोळा करू लागली.

दोन्ही घरे एकाच वेळी तयार झाली व आपले प्राणी आपापल्या घरांमध्ये राहू लागले.

कोल्ही बर्फाच्या खिडकीतून सशाकडे बघत हसली: "ए काळया पंजाच्या, किती भिकार खोपट बांधलंस! माझं घर बघ: स्वच्छ, चकचकीत, अस्सल बिलोरी राजवाडा!"

कोल्हीला हिवाळयात सारे काही छान होते. पण वसंताचा मोसम येताच

बर्फ वितळू लागले. जमीन उबदार बनू लागली, कोल्हीचा राजवाडा वितळू लागला. डोंगरावरून पाण्याचे ओहोळ धावू लागले. कोल्हीचे घर पाण्याबरोबर वाहून गेले. कोल्हीचे घराविना कसे भागणार? म्हणून बर्फाखालचे गवत खाण्यासाठी ससा घराबाहेर केव्हा पडतो ह्याची ती वाट पाहू लागली. ससा फिरायला जाताच ती त्याच्या घरात हळूच लपत छपत गेली, चुलाण्याच्या कडेवर चढली.

तेवढ्यात ससा आला, तो दार उघडू लागला, पण दार बंद होते! थोडा वेळ वाट पाहून त्याने दार ठोठावले – टक-टक!

"कोण आहे?" कोल्हीने दाट आवाजात विचारले.

"मी भुरा ससा, कोल्ही ताई, मला आत सोड!"

"चालता हो, आत घेणार नाही!" कोल्ही उत्तरली.

सशाने वाट पाहिली, तो म्हणाला:

"कोल्हीताई, थट्टा पुरे, मला आत सोड. मला झोप आली."

कोल्ही उत्तरली:

"जरा थांब चकण्या, मी उड्या मारते, तुला गदगदा खुदबळते आणि तुझे तुकडे तुकडे करते."

ससा बिचारा रडत वाट फुटेल तिकडे जाऊ लागला. त्याला भुरा लांडगा भेटला.

"राम राम सशा, रडतोस का? कसलं दुःख करतोस?"

"दुःख का करू नये मी? माझं लाकडी खोपट होतं, कोल्हीचं बर्फाचं घर होतं. कोल्हीचं घर वितळलं, पाण्याबरोबर वाहून गेलं. तिनं माझं खोपट बळकावलं. मी मालक असूनही माझ्या घरात मला ती सोडत नाही."

"जरा थांब – आपण तिला पळवून लावू!"

"काही उपयोगी नाही, लांडग्या, तिनं दार खूप घट्ट लावलंय!"

“मी नावाचा लांडगा आहे, कोल्हीला पळवून लावीन!” लांडगा गुरकावला.

ससा आनंदला व कोल्हीला पळवून लावण्यासाठी तो लांडग्याबरोबर निघाला.

ते दोघे सशाच्या घराजवळ आले.

“ए भुक्कड कोल्ही, दुसऱ्याच्या घरातून बाहेर नीघ!” लांडगा ओरडला.

कोल्हीने खोपटातून उत्तर दिले:

“जरा थांब, चुलाण्यावरून उतरते, उडी मारते, तुझे तुकडे तुकडे करते!”

“अरे बापरे, केवढी चिडलीय!” लांडगा शेपूट घालून पुटपुटला व जंगलात पळाला. बिचारा ससा मैदानात रडत बसला.

तेवढ्यात बैल आला.

"रामराम सशा, रडतोस का? कशाचं दुःख करतोस?"

"दुःख का करू नये? माझं लाकडाचं खोपट होतं, कोल्हीचं बर्फाचं. कोल्हीचं खोपट वितळलं, तिनं माझं बळकावलं. मी मालक असूनही ती मला माझ्या घरात सोडत नाही!"

"जरा थांब, आपण तिला पळवून लावू!"

"काही उपयोग नाही, बैला, ती घट्ट धरून बसलीय, लांडग्यालासुद्धा तिला पळवून लावणं जमलं नाही, तुला बैलाला काय जमणार?"

"मी अस्सल बैल आहे, कोल्हीला पळवून लावीन!" बैलाने डरकाळी फोडली.

ससा आनंदला, कोल्हीला पळवून लावण्यासाठी ती बैलाबरोबर निघाला. ते सशाच्या खोपटापाशी आले.

"ए भुक्कड कोल्ही, दुसऱ्याच्या घरातून ताबडतोब चालती हो!" बैलाने डरकाळी फोडली.

कोल्ही उत्तरली:

"जरा थांब, चुलाण्यावरून उतरते, बैला, तुझ्यापाशी येते, तुझे तुकडे तुकडे करते!"

"अरे बापरे, किती चिडलीय!" बैलाला वाटले. त्याने मान खाली घातली व धूम ठोकली.

ससा टेकाडापाशी बसला व रडू लागला.

तेवढ्यात एक अस्वल आले व म्हणाले :

"रामराम चकण्या, कसलं दुःख करून रडतोस ?"

"दुःख का करू नये मी ? माझं लाकडी खोपट होतं, कोल्हीचं बर्फाचं. तिचं वितळून गेलं, तिनं माझं खोपट बळकावलं. मी मालक असूनही ती मला माझ्या घरात सोडत नाही."

"जरा थांब", अस्वल म्हणाले, "आपण तिला पळवून लावू !"

"नाही अस्वलबुवा, तिला पळवून लावणं शक्य नाही. भक्कम बसलीय. लांडग्याला जमलं नाही, बैलाला जमलं नाही. तुला जमणार नाही !"

"जर तिला पळवून नाही लावलं, तर अस्वल म्हणवून घेणार नाही !"

ससा आनंदला, कोल्हीला पळवून लावण्यासाठी तो अस्वलाबरोबर बागडत निघाला. ते सशाच्या खोपटापाशी आले.

"ए भुक्कड कोल्ही," अस्वलाने आरोळी फोडली, "दुसऱ्याच्या खोपटातून चालती हो !"

कोल्ही उत्तरली :

"जरा थांब अस्वला, अंमळ चुलाण्यावरून उतरते, उडी मारते, तुझ्यापाशी येऊन तुझे तुकडे तुकडे करते !"

"अरे बापरे, केवढी संतापलीय !"
अस्वल ओरडले व धूम पळाले.

ससा बिचारा ! तो कोल्हीची विनवणी करू लागला, पण कोल्हीचे मन पाघळेना. ससा रडू लागला व वाट फुटेल तिकडे जाऊ लागला. खांद्यावर तलवार टाकलेला झुंजीचा लाल कोंबडा त्याला भेटला.



"रामराम सशा, कसा काय आहेस? कसल्या दुःखामुळं रडतोस?"

"दुःख का करू नको? स्वतःच्या घरातून हाकलून लावतात! माझं लाकडी खोपट होतं, कोल्हीचं बर्फाचं. तिचं खोपट वितळलं, तिनं माझं बळकावलं. मी मालक असूनही ती मला माझ्या घरात सोडत नाही!"

"जरा थांब," कोंबडा म्हणाला, "आपण तिला पळवून लावू!"

"कोंबडोबा, ते जमणार नाही, ती फार घट्ट बसून राहिलीय! लांडग्याला तिला पळवून लावणं जमलं नाही, बैलाला जमलं नाही, अस्वलाला जमलं नाही. तेव्हा तुला कसं जमणार?"

"प्रयत्न करू!" कोंबडा म्हणाला. कोल्हीला पळवून लावण्यासाठी तो सशासह निघाला. ते सशाच्या खोपटापाशी आले, तेवढ्यात कोंबडा गाऊ लागला:

"खांद्यावर तलवार टाकून
डौलात कोंबडा येतो,
टोपी शिवायला कोल्हीची
खांडोळी करायला येतो.
कोल्ही ताई, सांभाळ बाहेर ये!"

कोल्हीने कोंबड्याची धमकी ऐकताच तिची भीतीने पाचावर धारण बसली व ती म्हणाली:

"सोनेरी तुरेवाल्या, रेशमी दाढीवाल्या कोंबड्या, जरा थांब!"

पण कोंबडा ओरडला:

"कू कूच कू ड ड, सर्वांची खांडोळी करीन!"

कोल्ही बारीक नरम आवाजात विनवू लागली:

"कोंबड्या लाडक्या, ह्या म्हातारीवर दया कर, जरा अंगावर केसाळ कोट घालायला सवड दे!"

कोंबडा दारापाशी जोरात ओरडला:

"खांद्यावर तलवार टाकून
डौलात कोंबडा येतो,

टोपी शिवायला कोल्हीची
खांडोळी करायला येतो.
कोल्हीताई, सांभाळ बाहेर ये!"

कोल्हीचा उपाय चालेना: तिने दार हळूच उघडले व उडी मारली. कोंबडा सशासह खोपटात आला. तेव्हापासून ते गुण्यागोविंदाने राहू लागले.

ЛИСА И ЗАЯЦ

Русская народная сказка

На языке маратхи

THE FOX AND THE HARE

A Russian folk tale

In Marathi

© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९९०

सोविएत संघात मुद्रित

ISBN5—05—003021—8